# कारगील विजय दिवस साजरा

## श्री.शिवाजी महाविद्यालयात कारगील विजय दिवस साजरा



मोताळाःस्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे दिनांक २६ जुलै २०२२ रोजी कारगील विजय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला महाविद्यालयात प्राचार्य डॉ. गजानन जाधव हे अध्यक्ष तसेच प्रमुख उपस्थिती मा. श्री. सदाशिवराव घाटे ( माजी सैनिक ) हे लाभले. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागप्रमुख कॅप्टन अविनाश मेहेरकर आणि राष्ट्रीय छात्र सेना विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कारगिल युद्धात प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांच्या स्मरणार्थ आणि युद्धातील विजयाचे स्मरण म्हणून दरवर्षी २६ जुलै हा दिवस विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस ऑपरेशन विजय च्या यशाचे प्रतीक मानला जातो. यानिमित्ताने मान्यवरांनी त्याच्या मनोगतात , प्रत्येकाने आपल्या समाजासाठी, आपल्या बांधवांसाठी आपापल्या परीने मदत केली पाहिजे .स्वतंत्र भारताचा नागरिक या नात्याने सर्वच क्षेत्रात आपला हातभार लावला पाहिजे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. गजानन जाधव यांनी मार्गदर्शन केले. देशात शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी देशाच्या सीमेवर सैनिक अहोरात्र झटत असतात. त्यांचा सर्व भारतवासीयांना अभिमान वाटतो. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आजच्या तरुणांनी समाजातील अनिष्ट प्रथा परंपरांना बाजूला सारत सामाजिक बांधिलकी मानून कार्यरत राहिले पाहिजे असा मनोदय व्यक्त केला.मंचावर प्रा. डॉ. सुनील मामलकर, राष्ट्रीय छात्र सेना विभागातील कॅप्टन अविनाश मेहेरकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन अविनाश मेहेरकर , सूत्रसंचालन प्राध्यापिका सौ. नंदा मास्कर तसेच आभार प्रदर्शन प्रा. पुरुषोत्तम चाटे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी हे उपस्थित होते.

**स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे दिनांक २६ जुलै २०२२ रोजी कारगील विजय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयात प्राचार्य डॉ. गजानन जाधव हे अध्यक्ष तसेच प्रमुख उपस्थिती मा. श्री. सदाशिवराव घाटे ( माजी सैनिक ) हे लाभले. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागप्रमुख कॅप्टन अविनाश मेहेरकर आणि राष्ट्रीय छात्र सेना विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कारगिल युद्धात प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांच्या स्मरणार्थ आणि युद्धातील विजयाचे स्मरण म्हणून दरवर्षी 26 जुलै हा दिवस 'विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस 'ऑपरेशन विजय'च्या यशाचे प्रतीक मानला जातो. यानिमित्ताने मान्यवरांनी त्याच्या मनोगतात , प्रत्येकाने आपल्या समाजासाठी, आपल्या बांधवांसाठी आपापल्या परीने मदत केली पाहिजे .स्वतंत्र भारताचा नागरिक या नात्याने सर्वच क्षेत्रात आपला हातभार लावला पाहिजे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. गजानन जाधव यांनी मार्गदर्शन केले. देशात शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी देशाच्या सीमेवर सैनिक अहोरात्र झटत असतात. त्यांचा सर्व भारतवासीयांना अभिमान वाटतो. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आजच्या तरुणांनी समाजातील अनिष्ट प्रथा परंपरांना बाजूला सारत सामाजिक बांधिलकी मानून कार्यरत राहिले पाहिजे असा मनोदय व्यक्त केला.मंचावर प्रा. डॉ. सुनील मामलकर, राष्ट्रीय छात्र सेना विभागातील कॅप्टन अविनाश मेहेरकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन अविनाश मेहेरकर , सूत्रसंचालन प्राध्यापिका सौ.नंदा मास्कर तसेच आभार प्रदर्शन प्रा. पुरुषोत्तम चाटे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी हे उपस्थित होते.**


"कारगिल विजय दिन"
OPPO Reno5 Pro 5G
Gattuwar N | Buldhana, Maharashtra | 2022.07.26 12:59


श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा, जि. बुलढाणा.
१३ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. , खामगाव
"कारगिल विजय दिन"
दिनांक: २६ जुलै, २०२२
कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्य डॉ. गजानन जाधव
प्रमुख उपस्थिती :- मा. श्री. सदाशिवराव घाटे ( माजी सैनिक)
OPPO Reno5 Pro 5G
Gattuwar N | 2022.07.26 12:58